# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 14 December 2024

## Time 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक १४ डिसेंबर २०२४ दुपारी १.०० वा.

****

राज्य मंत्रिमंडळाचा उद्या विस्तार होणार आहे. उद्या नागपूर इथं मंत्र्यांचा शपथविधी होईल, अशी माहिती सुत्रांकडून मिळाली आहे.

****

लोकसभेत आज भारतीय संविधानाच्या पंच्याहत्तर वर्षांनिमित्त आयोजित विशेष चर्चासत्रात पंतप्रधान नरेंद्र मोदी हे सहभागी होणार आहेत. आज चर्चासत्राची सुरुवात संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजेजू यांनी केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधान निर्मितीतील योगदानाचं त्यांनी यावेळी कौतूक केलं. देशाने स्वातंत्र्यानंतर प्रत्येक नागरिकाला समान अधिकार दिले आहेत. अल्पसंख्याकांसोबत कोणताही भेदभाव केला जात नाही आणि त्यांना कायदेशीर संरक्षण असल्याचं रिजिजू म्हणाले. देशातील सहा अल्पसंख्याक समुदायांच्या कल्याणासाठी अनेक योजना राबविल्या जात असल्याचंही त्यांनी म्हटलं आहे. काल या चर्चासत्रात केंद्रीय गृहमंत्री राजनाथ सिंह यांच्यासह विविध पक्षांच्या लोकप्रतिनिधींनी आपापले विचार मांडले.

****

वन नेशन, वन इलेक्शन म्हणजेच एक राष्ट्र एक निवडणूक संबंधित दोन विधेयके येत्या सोमवारी लोकसभेत मांडली जाणार आहेत. केंद्रीय कायदा मंत्री अर्जुन राम मेघवाल हे सुधारणा विधेयक आणि केंद्रशासित प्रदेश कायदे दुरुस्ती विधेयक कनिष्ठ सभागृहात सादर करतील. यापुर्वी केंद्र सरकारने एक राष्ट्र, एक निवडणूक यासंदर्भात स्थापन केलेल्या उच्चस्तरीय समितीच्या शिफारशी स्वीकारल्या आहेत, त्यामुळे देशभरात एकाचवेळी निवडणुका घेण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केलेल्या उच्चस्तरीय समितीने राजकीय पक्ष आणि तज्ज्ञांसह संबंधितांशी विस्तृत चर्चा केली. या विधेयकांची

अंमलबजावणी दोन टप्प्यात केली जाणार आहे. पहिल्या टप्प्यात लोकसभा आणि विधानसभा निवडणुका एकाच वेळी घेतल्या जातील, तर पंचायत आणि नगरपालिकांसारख्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका सार्वत्रिक निवडणुकांच्या शंभर दिवसांच्या आत घेतल्या जातील, असं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

भारतीय रिझर्व्ह बँकेनं तारणमुक्त कृषी कर्जाची मर्यादा एक लाख साठ हजारांवरून दोन लाख रुपयांपर्यंत वाढवण्याची घोषणा केली आहे. या निर्णयाची अंमलबजावणी येत्या एक जानेवारीपासून होणार आहे. शेतकऱ्यांना अधिक चांगली वित्तीय सुविधा पुरवणं हा यामागील उद्देश आहे, असं कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयानं दिलेल्या एका निवेदनात सांगितलं आहे.

****

दिल्लीत सुरु असलेल्या मुख्य सचिवांच्या चौथ्या राष्ट्रीय परिषदेचं अध्यक्षस्थान पंतप्रधान नरेंद्र मोदी हे भूषवत आहेत. कालपासून सुरू झालेल्या तीन दिवसीय परिषदेत राज्यांच्या भागीदारीत एकत्रित कृतीसाठी समान विकास धोरण आणि सुसंगत कार्यक्रमांची आखणीसह अंमलबजावणीवर भर दिला जाईल. केंद्र आणि राज्य सरकारांमधील भागीदारी अधिक मजबूत करणं हे या परिषदेचं उद्दीष्ट आहे. केंद्र आणि राज्यांमध्ये दृढ सहकार्य वाढवण्याच्या उद्देशानं मुख्य सचिवांची परिषद हा एक महत्त्वाचा उपक्रम आहे. या परिषदेदरम्यान, विकसित भारतासाठी तंत्रज्ञान, आर्थिक विकास केंद्र म्हणून विकसित शहरं, गुंतवणुकीसाठी राज्यांमध्ये आर्थिक सुधारणा आणि कर्मयोगी मोहिमेद्वारे क्षमता निर्माण करणं यावर चार विशेष सत्रं देखील आयोजित केली जाणार आहेत.

****

निवडणूक आयोगानं दिल्लीच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना मतदार याद्यांची योग्य पडताळणी करूनच त्यात बदल आणि मतदारांचं नाव काढण्याची प्रक्रिया करण्याच्या सूचना दिल्या आहेत. मतदार यादीतील नाव हटवण्याच्या कोणत्याही प्रक्रियेमध्ये राजकीय पक्षांचा पूर्ण सहभाग असणं आवश्यक आहे, असं दिल्लीच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना दिलेल्या लेखी पत्रात निवडणूक आयोगानं सांगितलं आहे. त्यात बेकायदेशीर आणि तात्पुरत्या स्थलांतरितांची नावं आणि मतदार यादीतून पूर्वीच्या मतदारांची नावे वगळण्याची मागणी करण्याबाबत भाजपच्या प्रतिनिधींनी उपस्थित केलेल्या मुद्द्यांचा उल्लेख आहे. अर्जासह दावे आणि

हरकतींची यादी नियमितपणे सर्व राजकीय पक्षांना दिली जावी, तसंच मुख्य कार्यकारी अधिकारी या दिल्लीच्या संकेतस्थळावर देखील उपलब्ध करुन दिली जावी, असे निर्देशही आयोगाने दिले आहेत.

****

राज्यात आज सर्वत्र दत्तजयंतीनिमित्त ठिकठिकाणी वविविध कार्यक्रम होत आहेत. औदुंबर, गाणगापूर, माहूर, नृसिंहवाडी, कुरवपूर, कर्दळीवन या दत्ताच्या प्रमुख स्थानांसह विविध दत्त मंदिरात पहाटेपासून भाविकांची रीघ लागली आहे. यासह काकड आरती, मंगलआरती, अभिषेक, महापूजा, नैवेद्य, महाआरती,महाप्रसादासह विविध धार्मिक कार्यक्रम होत आहेत. सायंकाळी दत्तजयंती उत्सव, पालकी मिरवणूक आणि दत्तगुरू जन्माचा कीर्तनाचा कार्यक्रमही होणार आहे.

****